
इंद्रधनु मासा

मूळ लेखक: मार्कस फिस्टर

इंग्रजी रुपांतर: जे. ॲलिसन जेम्स





इंद्रधनु मासा



मराठी अनुवादः सुशील मेन्सन


खूप दूर खोल निळ्या सागरात एक मासा राहात होता. तो काही सामान्य मासा नव्हता. तो त्या सागरातील सर्वात सुंदर मासा होता. त्याच्या खवल्यांवर निळ्या, हिरव्या, जांभळ्या रंगांच्या विविध छटा होत्या. त्याचे काही खवले तर चांदीसारखे चमचमत होते.





त्याचे सौंदर्य पाहून इतर माशांना आश्चर्य वाटत असे. ते त्याला *इंद्रधनु मासा* म्हणत. “चल, इंद्रधनु माशा. चल, आमच्यासोबत खेळायला,” म्हणत ते त्याला बोलवत. पण इंद्रधनु मासा आपले चमचमते खवले दाखवत मोठ्या गर्वाने त्यांच्याजवळून निघून जात असे. तो त्यांच्याशी बोलतदेखील नसे.





एकदा एक छोटासा निळा मासा त्याच्या मागेमागे गेला. “इंद्रधनु माशा,” त्याने हाक मारली, “थांब ना जरा! मला तुझा एक चमचमता खवला देशील? ते किती विलक्षण आहेत! आणि तुझ्याकडे तर असे खूप सारे आहेत.”







“मी तुला माझा सुंदर खवला देऊ म्हणतोस? समजतोस कोण तू स्वतःला?” इंद्रधनु मासा खेकसला. “चल, निघ इथून.”

छोट्या निळ्या माशाला धक्काच बसला. तो दूर निघून गेला. तो खूप दुःखी झाला. त्याने आपल्या साऱ्या मित्रांना ही गोष्ट सांगितली. तेव्हापासून कुणीही इंद्रधनु माशाशी संबंध ठेवले नाहीत. तो जवळ आला की ते सर्व त्याच्यापासून दूर निघून जाऊ लागले.






कुणी पाहाणारच नसेल तर लखलखीत, चमचमत्या खवल्यांचा काय उपयोग? इंद्रधनु मासा एकाकी पडला.

एकदा त्याने आपले दुःख तारामाशाजवळ व्यक्त केले. “मी खरंच सुंदर आहे. मग मी कुणाला आवडत का नाही?”

“या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकत नाही,” तारामासा म्हणाला. “पण तू प्रवाळ खडकाच्या पलिकडे असलेल्या खोल गुहेत जा. तिथे तुला एक शहाणा *ऑक्टोपस* भेटेल. तो कदाचित तुला मदत करू शकेल.”

इंद्रधनु माशाला ती गुहा सापडली. गुहेत गुडुप अंधार होता आणि त्याला आत काहीच दिसत नव्हते. अचानक त्याला चमकणारे दोन डोळे दिसले. त्या काळ्याभोर अंधारातून ऑक्टोपस बाहेर आला.





“मी तुझीच वाट बघतोय,” ऑक्टोपस गंभीर आवाजात म्हणाला. “लाटांनी मला तुझी कहाणी सांगितली. आता माझा सल्ला ऐक. प्रत्येक माशाला तुझा एक चमचमता खवला देऊन टाक. मग भले तू सागरातला सर्वात सुंदर मासा राहाणार नाहीस, पण तुला तुझा आनंद मात्र गवसेल.”





"हे मला शक्य होईल असं वाटत नाही...." इंद्रधनु मासा म्हणू लागला, पण ऑक्टोपस त्याआधीच गुडुप अंधारात गायब झाला होता.

माझे खवले देऊन टाकू! माझे सुंदर चमचमते खवले! ते नसतील तर मी आनंदी कसा राहू शकेन?



अचानक त्याला कुणाच्या तरी पराचा हलकासा स्पर्श झाला. छोटा निळा मासा परत त्याच्याजवळ आला होता.

“इंद्रधनु माशा, रागावू नकोस. मला फक्त एकच छोटासा खवला पाहिजे.”


इंद्रधनु मासा संकोचला. “फक्त एकच चमचमता खवला तर हवाय त्याला,” तो मनाशी म्हणाला. “एका खवल्यामुळे माझे काही नुकसान होणार नाही.”

इंद्रधनु माशाने एक लहानसा खवला काळजीपूर्वक काढून छोट्या निळ्या माशाला दिला.



“आभार! खूप आभार तुझे!” छोटा निळा मासा हरखून गेला. त्याने तो चमचमता खवला आपल्या निळ्या खवल्यांमध्ये लावून टाकला.


इंद्रधनु माशाला आनंदाची एक वेगळीच अनुभूती जाणवली. बराच वेळ तो नवीन चमचमता खवला लावून पाण्यात इकडे-तिकडे पोहोणाऱ्या छोट्या निळ्या माशाकडे बघत राहीला.





आपला चमचमता खवला मिरवत छोटा निळा मासा समुद्रात वेगाने पोहत दूरवर गेला. थोड्याच वेळात इतर माशांनी इंद्रधनु माशाभोवती गर्दी केली.

प्रत्येकालाच चमचमता खवला हवा होता. इंद्रधनु मासा जसजसे प्रत्येकाला आपला खवला देऊ लागला, तसतसे त्याचा आनंद वाढू लागला. जेव्हा सभोवतालचे पाणी लखलखत्या खवल्यांनी चमचमू लागले तेव्हा कुठे त्याला आपल्या कुटुंबात परतल्यासारखे वाटू लागले.







अखेरीस, इंद्रधनु माशाच्या शरीरावर एकच खवला उरला. त्याची मौल्यवान संपत्ती आता त्याच्याजवळ उरली नव्हती आणि तरीही तो खूप आनंदी होता.

“चल, इंद्रधनु माशा, आमच्यासोबत खेळायला,” म्हणत इतर मासे त्याला हाका मारू लागले.

“हे काय आलोच मी!” म्हणत इंद्रधनु मासा आनंदाने पोहत आपल्या मित्रांपाशी गेला.





समाप्त